दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ३४ वा गुरूवार दि.०४ जुलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# राष्ट्रवादी अजित पवार ८५ जागा लढविणार

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर नुकतीच मुंबईत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या आमदारांची आणि प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत राष्ट्रवादी विधानसभा निवडणूक महायुतीतूनच लढणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याचबरोबर यावेळी राष्ट्रवादी ८५ जगांवर लढणार असल्याची विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्याची माहिती मिळाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीत कोणता पक्ष किती जागा लढवणार यावरून रस्सीखेच सुरू आहे. राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेनेचे काही नेत वेगवेगळ्या प्रकारचे दावे करत होते. त्यामुळे महायुतीतच संभ्रम निर्माण झाला होता. आता अजित पवार यांच्या पक्षाच्या बैठकीत ८५ जगा लढविण्याचा निर्णय झाल्याने तिन्ही पक्षातील नेत्यांचे दावे हवेतच विरल्याचे पाहायला मिळत आहे. अजित पवार यांच्या पक्षाच्या बैठकीत ८५ जागा लढविण्याचा निर्णय झाला असला तरी महायुतीतील भाजप आणि शिवसेना यावर काय प्रतिक्रिया देणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



विधानसभेसाठी २८८ जागा राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. त्यातील राष्ट्रवादीने ८५ लढवल्या तर २०३ जागा उरतात. सध्या राज्यात भाजपचे १०६ आमदार आहेत. याबरोबर सुमारे दहा अपक्ष आमदारांचा भाजपला पाठिंबा आहे. त्यामुळे राहिलेल्या २०३ जगांमधील ११५-१२० जागा भाजपकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे उरलेल्या ८०-८५ जगांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्ष तयार होतो का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

वादग्रस्त विधाने टाळण्याच्या सूचना अजित पवार यांचे शासकीय निवस्थान असलेल्या देवगिरी बंगल्यावर झालेल्या बैठकीत पदाधिकारी, प्रवक्ते आणि आमदारांनी मित्र पक्षांबाबतची वादग्रस्त विधाने टाळण्याची सूचना देण्यात आली आहे. कारण गेल्या काही दिवसांमध्ये शिवसेना-राष्ट्रवादी, भाजप-राष्ट्रवादी यांच्यातील नेते, पदाधिका-यांमध्ये शाब्दिक चकमक पाहायला मिळाली आहे. त्यामुळे राज्यात महायुती टिकणार की नाही अशी चर्चा सुरु झाली होती.

# १४ जुलैपासून राहुल गांधी येणार वारीत

पुणे : आषाढ महिना आला की महाराष्ट्रातील तमाम जनतेला वारीचे वेध लागतात. आषाढी एकादशीला पंढरपुरात जाऊन विठुरायाचे दर्शन 'याचि देही, याचि डोळा' घेतल्यानंतर वारकरी तृप्त होतात. यंदा १७ जुलै रोजी आषाढी आहे. त्यासाठी राज्यभरातून संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. या वारीला आता राजकारणाची चाहूल लागली आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राहुल गांधी यांना वारीत येण्याचे निमंत्रण दिले आहे. त्यासाठी त्यांनी वारीचे महत्त्व राहुल गांधी यांना समजावून सांगितले. त्यानंतर राहुल गांधी १४ जुलै रोजी वारीत सहभागी होणार आहेत, असे कॉँग्रेसचे आमदार संजय जगताप यांनी सांगितले.

आमदार संजय जगताप म्हणाले की, संत सोपानकाका यांच्या पालखी सोहळ्यात दीड लाख वारकरी सहभागी झाले आहेत. आता कॉँग्रेस नेते राहुल गांधी १४ जुलै रोजी वारीत सहभागी होणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांचे दर्शन ते वारीत घेणार आहेत. तसेच सर्वसामान्य वारक-याप्रमाणे राहुल गांधी वारीत चालतील. राहुल गांधी यांना वारीत सहभागी होऊ न देण्याच्या शिवसेनेच्या भूमिकेवरही संजय जगताप यांनी उत्तर दिले आहे. वारीच्या सोहळ्यात राजकारणाचे जोडे बाजूला ठेवा. तुम्हाला सहभागी व्हायचे असेल तर वारीत सहभागी व्हा. वारीच्या सोहळ्यात काय त्रुटी आहेत, त्या दूर करण्याचा प्रयत्न करा.





भाजपकडून शरद पवार यांच्यावर हल्ला सातत्याने आपल्या आक्रमक वक्तव्यांसाठी, भूमिकांसाठी प्रसिद्ध असणारे भाजपा आध्यात्मिक आघाडी प्रमुख आचार्य तुषार भोसले यांनी राहुल गांधी यांच्या वारीत सहभागी होण्याचा निर्णयास विरोध केला आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महिलांना मोठ्या प्रमाणात मिळवून द्यावा

## भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपा लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांना आवाहन

लातूर : - मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही योजना राज्यातील महायुती शासनाने सुरू केली असून या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा दीड हजार रुपयाचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. या योजनेकरिता अर्ज दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे तेव्हा भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या योजनेचा अधिकाधिक महिलांना लाभ मिळवून द्यावा असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

राज्यातील महायुती शासनाने आजपर्यंत अनेक जनहिताचे आणि लोककल्याणकारी निर्णय घेतले असून महिला, मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनविणे आणि त्यांच्या सशक्तीकरणाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची घोषणा करून महिला भगिनींना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आभार व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांनी या योजने अंतर्गत पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपयाचे राज्य शासन अर्थसहाय्य करणार आहे तेव्हा या योजनेचा महिलांनी मोठ्या प्रमाणात लाभ मिळून घ्यावा असे बोलून दाखविले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा अधिका अधिक महिलांना लाभ मिळावा यासाठी काही राज्य शासनाने कागदपत्रात शिथिलता दिली असून पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड असेल तर त्यांना अडीच लाख रुपये उत्पन्नाचा दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात येणार आहे. सदर योजनेत पाच एकर शेतीची अट होती. ती आता वगळण्यात आली आहे. कुटुंबातील अविवाहित महिलेलाही या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, सदर योजनेत लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६५ वर्ष वयोगट निश्चित करण्यात आला आहे. लाभार्थींना ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे.



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा म्हणून अर्ज दाखल करण्यासाठी ठिकठीकाणी महिला वर्गाची गर्दी वाढली आहे. या योजनेचा लाभ मिळवून देतो असे सांगून पैसे उकळणाऱ्या दलालांपासून महिलांनी सावध राहावे, आपली फसवणूक आणि लूट होणार नाही याची काळजी घ्यावी असे आव्हान करून भारतीय जनता पार्टीच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ मिळावा याकरिता महिलांना मदत करावी सहकार्य करावे अशा सूचना आमदार रमेशआप्पा कराड यांनी दिल्या आहेत.

# महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यासंदर्भात आंदोलन करणार जिल्हाधिकारी यांना निवेदन

लातूर:- महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यासंदर्भात आंदोलन करणार जिल्हाधिकारी यांना निवेदन शासन स्तरावरुन कोणतीही सकारात्मक कार्यवाही होत नसलयाने आंदोलनाच्या भुमिकेत महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना, नाशिक यांनी दिनांक २३/०६/२०२४ रोजी महसूल मंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व अपर मुख्य सचिव (महसूल) यांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनामध्ये यापूर्वी महसूल मंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये विविध मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय पारीत करण्याचे संघटनेस आश्वस्त करण्यात आले होते, परंतू निर्णय निर्गमीत करण्यात आलेले नसल्याने शासनास बेमुदत संपाची नोटीस देण्यात आलेली आहे. त्या करिता राज्य संघटना यांनी खालील प्रमाणे आंदोलनाचे टप्पे ठरवून शासनास नोटीस दिलेली आहे. आंदोलनाची दिशा बुधवार दि.१०/०७/२०२४ काळया फीती लावून काम करणे. गुरुवार दि.११/०७/२०२४ जेवणाच्या सुटीमध्ये कार्यालयाच्या गेटवर निदर्शने करणे. शुक्रवार दि. १२/०७/२०२४ लेखणीबंद आंदोलन. सोमवार दि.१५/०७/२०२४ बेमुदत कामबंद आंदोलन. वरील प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बेमुदत संपाला राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना, नाशिक यांचे अहवानानुसार लातूर जिल्यातील सर्व महसूल कर्मचारी (वर्ग-३ व वर्ग-४) आपआपल्या कार्यालयासमोर राज्यव्यापी संपामध्ये १००% सहभागी होत आहेत.



# घोरपडींची विक्री; वन विभागाच्या पथकावर जीवघेणा हल्ला

अमरावती : अमरावतीच्या वडाळी परिसरात घोरपडींची राजरोस विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दरम्यान, वडाळी येथील पारधी बेड्यावर विक्रीसाठी काही घोरपडी आणल्या गेल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. ही माहिती मिळताच ही विक्री रोखण्यासाठी गेलेल्या वनविभाग आणि पोलिसांच्या पथकावर येथील समूहाकडून प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात वन विभागाचे दोन वनमजूर जखमी झाले असून पोलिस पथकाने हल्ला परतवून लावत चार घोरपडी जप्त केल्या आहेत. तसेच यातील एका संशयित आरोपीलाही ताब्यात घेण्यात आले आहे. सायंकाळच्या सुमारास ही थरारक घटना घडली असून या प्रकारामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.



राज्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावली आहे. दरम्यान अनेक भागात पावसाळ्याच्या प्रारंभी घोरपडींची छुप्या पद्धतीने विक्री काही समूहाकडून केली जाते. अमरावतीच्या वडाळी येथील पारधी बेड्यावरही विक्रीसाठी घोरपडी आणल्या गेल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. दरम्यान, वन विभागाने तात्काळ पोलिसांच्या मदतीने पारधी बेड्यावर धाड टाकली. त्यामुळे बिथरलेल्या पारधी समूहाने वन विभाग आणि पोलिस विभागाच्या पथकावर हल्ला चढवला. या घटनेत एक वनमजूर जखमी झाला आहे. तर या घटनेतील एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. तर इतर काही लोक पळून गेल्याची माहिती आहे. वनविभागाच्या सहायक वनसंरक्षक ज्योती पवार यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे. तर या घटनेचा पुढील तपास सध्या वन विभाग आणि पोलिस करत आहेत.

# पालखी मार्गावरील मरीआई चौक येथील रस्ता खुला करा

सोलापूर - शेगांव वरून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे श्री संत गजानन महाराजांची पालखी दि. १० ते १२ जुलै २०२४ या कालावधीमध्ये सोलापूरामध्ये मुक्कामी असते. ती दिंडी हि भैय्या चौक मरीआई चौक मार्गे प्रस्थान करत असते. यामुळे यामुळे भैय्या चौक ते मर्यायचो वरील लावलेले पोल हटवण्यात यावेत एक दिवसासाठी अन्यथा शिवसेनेच्या वतीने आदल्या दिवशी ते लोखंडी पूल उघडण्यात येतील असा इशारा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी रेल्वे व्यवस्थापक नीरज दोहरे यांना दिला.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक) ते मरीआई चौक रेल्वे उड्डाणपुलाला शंभर वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यामुळे जड वाहतुकीसाठी हा पूल धोकादायक ठरला आहे. म्हणून भर रस्त्यात रेल्वे विभागामार्फत लोखंडी खांब रोवण्यात आले आहेत. या खांबा मध्ये सहा फूट अंतर ठेवल्यामुळे वाहनांना हळुवारपणे जावे लागत आहे. त्यामुळे दररोज दोन्ही बाजूस वाहतुकीची कोंडी होत आहे. सकाळ व संध्याकाळी शाळांच्या वेळी शाळकरी मुलांची या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे गैरसोय होत आहे. रात्रीच्या वेळी खांब न दिसल्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. हा रस्ता सी.एन.एस. हॉस्पीटलकडेही जातो. त्यामुळे हा रस्ता महत्त्वाचा व रहदारीचा आहे.शेगांव वरून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे श्री संत गजानन महाराजांची पालखी दि. १० ते १२ जुलै या कालावधीमध्ये सोलापूरामध्ये मुक्कामी असते. त्यावेळी दिंडी ही भैय्या चौक मरीआई चौक मार्गे प्रस्थान करणार आहे. या दिंडी सोबत हत्ती, घोडे, व पालखी हि असतात. या दिंडी मधील वारकऱ्यांना व त्यांच्या वाहनांना यामुळे फार मोठा त्रास सहन करावा लागणार आहे.



## संपादकीय....

# नियम आणि नियत!

मुद्दा सोरेन भ्रष्ट की अभ्रष्ट हा नसून आपल्या धन्याच्या समाधानासाठी केंद्रीय यंत्रणा कोणत्या थरास जाऊ शकतात हा आहे.. ‘दंड’ न करता ‘न्याय’ करणारी नवी संहिता वाजत–गाजत अमलात येत असताना आणि राजधानी दिल्लीत या नव्या नियमावलीचे गुणगान सत्ताधाऱ्यांकडून सुरू असताना तिकडे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना उच्च न्यायालयाने दिलेल्या जामिनाची चर्चा होणे हा खरा काव्यात्म न्याय. सोरेन हे सत्ताधारी भाजपस आव्हान देणाऱ्या झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाचे प्रमुख होते आणि आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात त्यांना तुरुंगात डांबून त्या पक्षावर मात करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला. त्या प्रांतांतील राजकीय रिवाजाप्रमाणे सोरेन तुरुंगात असताना त्यांच्या पत्नीने किल्ला लढवला या वा अन्य कारणांमुळे सोरेन यांस मिळालेला जामीन महत्त्वाचा ठरतो, असे बिलकूल नाही. तर ज्या गुन्ह्यासाठी सोरेन यांस सक्तवसुली संचालनालयाने तुरुंगात डांबले, जो आर्थिक घोटाळा सोरेन यांनी केला असे केंद्रीय पातळीवर कंठशोष करून सांगितले जात होते, ज्या भ्रष्टाचारासाठी सोरेन यांच्यावर ठपका ठेवला जात होता ते वा तसे काही करण्यात सोरेन यांचा हात असल्याचा पुरावा नाही, असे न्यायाधीश सोरेन यांस जामीन देताना म्हणतात ही बाब संबंधित यंत्रणांसाठी आणि ती यंत्रणा राबवणाऱ्यांसाठी लाजिरवाणी ठरते. या नामुष्कीवर निर्विवाद मालकी हक्क केंद्र सरकारचा. संसदेत राजकीय प्रतिस्पर्ध्यास केंद्रीय यंत्रणांच्या ससेमिऱ्याद्वारे नामोहरम करण्याचा कसा प्रयत्न होतो याचे वाभाडे निघत असताना त्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचे एकूणच प्रकरण मुदलात समजून घेणे रास्त. सोरेन यांस अटक झाली ३१ जानेवारी रोजी. मनरेगा, खाण कंत्राट इत्यादींतील सोरेन यांच्या कथित घोटाळ्यांची सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी सुरू होती. यापेक्षाही गंभीर होता तो लष्करी अधिकाऱ्यांसाठी असलेला भूखंड सोरेन यांनी अवैधपणे विकल्याचा आरोप. हा जमीन विक्रीचा प्रकार प्रथम आढळला लष्करी यंत्रणेस. आपल्या अखत्यारीतल्या जमिनींच्या नोंदी तपासत असताना झारखंडमधील जागेच्या मालकीबाबत काही फेरफार झाल्याचे या विभागास लक्षात आले आणि त्यामुळे त्याची चौकशी सुरू झाली. यात नाव समोर आले ते कोणा भानु प्रताप प्रसाद नामे इसमाचे. ही सरकारी सेवेतील व्यक्ती जमिनींच्या व्यवहारांसाठी त्या भागात ओळखली जाते. लष्कराच्या या जमीन व्यवहारात तिचा सहभाग असल्याच्या संशयावरून गतसाली एप्रिल महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने धाडसत्र हाती घेतले. त्यात ‘कित्येक ट्रंका’ भरून जमीन व्यवहारांचा दस्तावेज साठा त्याच्या घरून हाती घेण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगितले गेले. सरकारी सेवेत असलेल्या या प्रसाद यांचे लागेबांधे थेट मुख्यमंत्री सोरेन यांच्याशी आहेत असे सक्तवसुली यंत्रणेचे म्हणणे. त्यात सोरेन हे केंद्र सत्ताधारी भाजपस राजकीयदृष्ट्या प्रतिकूल हा केवळ योगायोग म्हणायचा. त्याच योगायोग मालिकेतून या प्रसाद यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आणि ती करता करता संबंधित यंत्रणेने गतसाली सोरेन यांच्यावरही गैरव्यवहारांचा ठपका ठेवून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला गेला. या प्रसाद यांस तुरुंगात डांबल्यानंतर त्यांच्या मोबाइल फोनमधील तपशील तपास यंत्रणांनी काढून घेतला आणि त्याद्वारेही त्याचे आणि सोरेन यांचे संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला. यात वादग्रस्त ठरलेला जमिनीचा तुकडा प्रत्यक्षात सोरेन यांच्या मालकीचा आहे, असेही सांगितले गेले आणि ही मालकी सिद्ध करण्यासाठी जंग जंग पछाडले गेले. ही लष्करी जमीन खरेदी करण्याचा अधिकार सोरेन यांस मुळातच नाही आणि तरीही त्यांनी हा जमीन व्यवहार केला हा यातील मध्यवर्ती आरोप. ‘प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉण्डिरग अ‍ॅक्ट’ (पीएमएलए) या सध्या विरोधी पक्षीयांविरोधात परवलीच्या झालेल्या कायद्यांतर्गत सोरेन यांच्याविरोधात प्रकरण चालवले गेले आणि अखेर जानेवारी महिन्याच्या अखेरीस त्यांस अटक झाली.

म्हणजे सोरेन यांनी कधी न्यायालयीन कोठडी तर कधी पोलीस कोठडी असे पाच महिने तुरुंगात घालवले. गेल्या शुक्रवारी त्यांस जामीन मिळाला. तो देताना झारखंड उच्च न्यायालयाचे न्या. रंगोन मुखोपाध्याय यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या आरोपपत्राची जी चिरफाड केली ती लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या जमिनीबाबत सोरेन यांच्यावर ठपका ठेवला गेला त्या जमिनीवर इतकी वर्षे वास्तव्य करणाऱ्यांनी इतक्या वर्षांत या व्यवहाराबाबत काहीच कसा आवाज उठवला नाही येथपासून ते या जमिनीवर सोरेन हे भोजनगृह बांधू इच्छितात हे सक्तवसुली संचालनालयाच्या अधिकाऱ्यांस आधीच कसे काय कळले येथपर्यंत अनेक मुद्दे उपस्थित करून न्यायाधीशांनी या यंत्रणेची पिसे काढली. या प्रकरणात सदर जमिनीशी आपला काहीही संबंध नाही हे सोरेन यांनी वारंवार सांगितले आणि तसे प्रतिज्ञापत्रही दिले. पण तरीही सोरेन यांच्याविरोधात केंद्रीय यंत्रणेची कारवाई सुरूच राहिली. पण सोरेन आणि ही जमीन खरेदी यांचा काही संबंध असल्याचे चौकशी यंत्रणा सिद्ध करू शकल्या नाहीत. आता अखेर न्यायालयाने ‘‘या प्रकरणी सोरेन यांचा हात असेल हे सिद्ध होत नाही’’ अशा आशयाचे मत नोंदवून सोरेन यांची सुटका केल्याने ही यंत्रणा आणि तिचे केंद्रीय सूत्रधार तोंडावर आपटले. पुढे या प्रकरणी झारखंड उच्च न्यायालयाच्या आदेशास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाणार आहे किंवा काय हे स्पष्ट झालेले नाही. पण ते तसे दिले गेले तरी उच्च न्यायालयाने जामीन दिलेला असेल तर सर्वोच्च न्यायालय तो सहसा रद्द करत नाही. त्यामुळे सोरेन जामिनावर राहतील असे दिसते. याचा अर्थ सोरेन हे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत वा असतील असे मानण्याच्या भाबडेपणाची गरज नाही. फारच कमी राजकारण्यांच्या अभ्रष्टतेवर विश्वास ठेवावा अशी सध्याची स्थिती. तेव्हा ते भ्रष्ट की अभ्रष्ट हा मुद्दा नाही. तर आपल्या धन्याच्या समाधानासाठी केंद्रीय यंत्रणा कोणत्या थरास जाऊन काय काय करतात हा मुद्दा आहे. यातून या यंत्रणांच्या सच्चेपणाविषयीच प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे एखाद्याविरोधात या यंत्रणांनी कितीही प्रामाणिकपणे कारवाई सुरू केली असली तरी त्यामागे काही राजकीय काळेबेरे असेल असेच अलीकडे बहुतेकांस वाटू लागते आणि ते तसे वाटणे बऱ्याचदा रास्त असते. तसेच गुन्हा दाखल करण्यापासून ते आरोप न्यायालयात सिद्ध होऊन संबंधितास शासन ठोठावले जाण्यात यशस्वी ठरण्याचे या यंत्रणांचे प्रमाण इतके नगण्य आहे की त्यामुळे त्यांच्या चौकशी– त्यातही केंद्रीय अधिक– यंत्रणांवरील विश्वासास तडा जातोच जातो.

# (स्वामी विवेकानंद पुण्यस्मरण विशेष.)

_ विवेकानंद हे त्यांच्या समकालीन भारतातील सर्वात प्रभावशाली तत्त्वज्ञ आणि समाजसुधारकांपैकी एक होते. तसेच ते पाश्चात्य जगामध्ये वेदांताचे सर्वात यशस्वी मिशनरी होते. समकालीन हिंदू सुधारणा चळवळींमध्येही ते एक प्रमुख शक्ती होते आणि त्यांनी वसाहतवादी भारतातील राष्ट्रवादाच्या संकल्पनेत योगदान दिले. आधुनिक भारतातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती आणि देशभक्त संत म्हणून त्यांना आता व्यापकपणे ओळखले जाते. त्यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. संतचरणधूळ: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा सदर बोधप्रद संकलित लेख अभ्यासा..

स्वामी विवेकानंद (१२ जानेवारी १८६३– ४ जुलै १९०२; नरेंद्रनाथ दत्त) हे एक भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ होते. रामकृष्ण परमहंस यांचे ते शिष्य होते. ते पाश्चात्य गूढवादाने प्रभावित झाले. तसेच त्यांनी पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा (शिकवण, पद्धती) परिचय करून देण्यात प्रमुख भूमिका निभावली. स्वामी विवेकानंदजींचे तत्त्वविचार आणि शिकवण– गुरू रामकृष्ण परमहंस हे हिंदू तत्त्वज्ञानाच्या वेदान्त शाखेचे पुरस्कर्ते होते. आद्य शंकराचार्य यांच्या विचारांना पुढे नेत त्यांनी हे तत्त्वज्ञान प्रतिपादित केले. त्यांच्या मते सर्व प्राणिमात्र शिवाचे अंश आहेत, त्यामुळेच शिवभावे जीवसेवा हे रामकृष्ण यांचे वचन त्यांनी शिरोधार्य मानले. प्रत्येक जीव हा मूळ रूपातच ईश्वरी– दैवी आहे. अंतर्गत आणि बाह्य स्वभावावर नियंत्रण मिळवून त्याच्यातील दैवी अंशास जागृत करणे, हे आपले ध्येय आहे. कर्म, पूजा, मानसिक नियंत्रण किंवा तत्त्वज्ञान यापैकी एक किंवा अनेक मार्गांचा उपयोग करून मुक्ती मिळवली पाहिजे. उठा, जागे व्हा, आणि आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.

दरिद्री नारायण हा शब्द विवेकानंदानी जगाला दिला. त्यांचा बंगाली कवितेतील अंश–

बहुरुपे सम्मुखे तोमार छाडि।
कोथाय खूंजिछो ईश्वर।।
जीवे प्रेम करे जेई जन।
सेई जन सेविछे ईश्वर।।

अर्थ– ईश्वर अनेक रूपाने तुझ्या समोर उभा आहे. ते सोडून तू कुठे ईश्वराला शोधतोस? जे कोणी प्राणिमात्रांवर प्रेम करतात, तेच ईश्वराची खरी सेवा करतात. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू धर्माला प्रमुख जागतिक धर्माच्या दर्जात आणून आंतरधर्मीय जागरूकता वाढवण्याचे श्रेय विवेकानंदांना दिले जाते. भारतातील हिंदू सुधारणा चळवळींमध्ये ते प्रमुख होते. त्यांनी ब्रिटिशशासित भारतात राष्ट्रवाद आणण्यात योगदान दिले. स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशनची स्थापना केली. माझ्या अमेरिकेच्या बहिणी आणि बंधूंनो..., या शब्दांनी सुरू झालेल्या त्यांच्या भाषणासाठी ते फार प्रसिद्ध आहेत. ज्यामध्ये त्यांनी सन १८९३मध्ये शिकागो येथील जागतिक धर्माच्या परिषदेत हिंदू धर्माचा परिचय दिला.

उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे दि.१२ जानेवारी १८६३ सोमवारी सकाळी ६:३२ वा. पौष कृष्ण सप्तमी, संक्रांतीच्या दिवशी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात वकीलाचे अ‍ॅटर्नी होते. ते सामाजिक आणि धार्मिक बाबीत पुरोगामी विचाराचे आणि दयाळू स्वभावाचे होते. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवतगीता आदि धार्मिक साहित्यात त्याने विशेष आवड दाखवली. किशोरावस्थेपासूनच ते व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते. नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. नंतर त्यांनी सन १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला. ते सन १८७९मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. काही दिवस या संस्थेत राहिल्यानंतर पुढे त्यांनी जनरल असेम्ब्लीज इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला. येथे त्यांनी तर्कशास्त्र, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, आणि युरोपचा इतिहास यांचा अभ्यास केला. सन १८८१ साली ते फाइन आर्टची आणि सन १८८४मध्ये बीएची परीक्षा उत्तीर्ण झाले. नरेंद्रनाथांनी डेविड ह्युम, इम्यानुल कँट, गोत्तिलेब फित्शे, बारूच स्पिनोझा, जॉर्ज हेगेल, आर्थर शोपेनहायर, ऑगस्ट कोम्ट, हर्बट स्पेंसर,जॉन स्टुअर्ट मिल आणि चार्ल्स डार्विन इत्यादी विचारवंतांच्या लेखनाचा अभ्यास केला होता. हर्बर्ट स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाने ते प्रभावित झाले होते. गुरुदास चटोपाध्याय या बंगाली प्रकाशकासाठी त्यांनी स्पेन्सरच्या ‘एज्युकेशन’ या पुस्तकाचा अनुवादही केला होता. काही काळ त्यांनी स्पेन्सर यांच्याशी संपर्कही स्थापन केला होता. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासोबत त्यांनी प्राचीन संस्कृत आणि बंगाली ग्रंथांचाही गाढ अभ्यास केला होता. त्यांच्या प्राध्यापकांच्या मते नरेंद्र एक प्रतिभावान विद्यार्थी होते. १८८१–८४ मध्ये ते जेथे शिकले त्या स्कॉटिश चर्च कॉलेजचे प्राचार्य डॉ.विल्यम हेस्टी यांनी म्हटले आहे की, नरेंद्र खरोखरच बुद्धिमान आहे. मी खूप फिरलो, जग पाहिले, परंतु त्याच्यासारखी प्रतिभा आणि बुद्धिसामर्थ्य असलेला मुलगा अगदी जर्मन विद्यापीठातल्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्येही मला बघायला मिळाला नाही. त्यांना श्रुतिधारा– विलक्षण स्मरणशक्ती असलेला म्हटले जात असे. एवढ्या तरुण मुलाने एवढे वाचले असेल, असे मला वाटले नव्हते. असे महेंद्रलाल सरकारांनी त्यांच्याशी चर्चा केल्यावर म्हटले होते.



कोलकात्यात शिमला नामक मोहल्ल्यात सुरेंद्रनाथ मित्र यांनी रामकृष्ण परमहंस यांना आपल्या घरी एका समारंभासाठी बोलविले होते. त्यावेळी कुणी चांगला गायक न मिळू शकल्याने त्यांना आपल्या शेजारी राहणाऱ्या नरेंद्रला बोलावून आणले. इ.स. १८८१ च्या नोव्हेंबर महिन्यात श्री रामकृष्ण पहिल्यांदाच नरेंद्रला भेटले आणि त्याचे गायन ऐकून संतुष्ट झाले. त्यांनी त्याला दक्षिणेश्वर येथे येण्याचे आमंत्रण दिले. सूक्ष्म योगदृष्टीच्या साहाय्याने श्रीरामकृष्ण नरेंद्रनाथांचा महिमामय अति उज्ज्वल भावी काल पाहू शकले होते म्हणूनच ते नरेंद्राकडे आकृष्ट झाले, असे दिसते.

अनन्यचित्त होऊन गुरूने सांगितलेल्या मार्गाने साधना करीत नरेंद्र उन्नती साधत होता. रामकृष्णांच्या पवित्र सहवासात नरेंद्रात आमूलाग्र बदल झाले. त्यांच्यासह असलेल्या अन्य तरुण साधकांनी रामकृष्णांच्या आदर्शांना स्वीकारून काशीपूरच्या उद्यानात तपश्चर्या केली. रामकृष्णांच्या सेवेत हे सर्व तरुण सतत राहिल्याने त्या सर्वांच्यात अपूर्व आध्यात्मिक प्रेमसंबंध जोपासले गेले. येथे या ठिकाणीच भावी ’रामकृष्ण संघाची’ पायाभरणी झाली. याच ठिकाणी एका शुभ दिवशी रामकृष्ण यांनी आपल्या यास सर्व शिष्यांना भगवी वस्त्रे देऊन संन्यासदीक्षा दिली. संन्यासग्रहणानंतर गतकालीन युगप्रवर्तक संन्यासी मंडळींचे जीवन आणि उपदेश यांचे अनुशीलन करणे हेच नरेंद्राचे लक्ष्य बनले. नरेंद्राच्या घरी लहानाचे मोठे झालेले त्यांचे नातेवाईक डॉ. रामचंद्र दत्त हे रामकृष्णांचे भक्त होते. धर्मभावनेने प्रेरित होऊन नरेंद्राच्या मनात लहानपणीच तीव्र वैराग्य उत्पन्न झालेले पाहून डॉ. दत्त एकदा त्यांना म्हणाले, भाई, धर्मलाभ हेच जर तुझ्या जीवनाचे उद्दिष्ट असेल, तर तू ब्राह्मोसमाज वगैरेंच्या भानगडीत पडू नकोस. तू दक्षिणेश्वरीला श्रीरामकृष्णांकडे जा. एके दिवशी त्यांचे शेजारी सुरेंद्रनाथ यांच्याकडेच रामकृष्ण परमहंसांचे त्यांना दर्शन झाले. सुरुवातीचे काही दिवस रामकृष्ण नरेंद्रनाथांना आपल्यापासून क्षणभरही दूर ठेवू इच्छित नसत. त्यांना जवळ बसवून अनेक उपदेश करत. ते दोघेच असतांना त्यांची आपापसांत खूप चर्चा होत असे. रामकृष्ण त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या कार्याचा भार नरेंद्रनाथांवर सोपवणार होते. एके दिवशी रामकृष्णांनी एका कागदाच्या कपट्यावर लिहिले, नरेंद्र लोकशिक्षणाचे कार्य करील. काहीसे आढेवेढे घेत नरेंद्रनाथ त्यांना म्हणाले, हे सारे माझ्याने होणार नाही. रामकृष्ण त्यांना लगेच दृढपणे म्हणाले, होणार नाही? अरे तुझी हाडं हे काम करतील. पुढे रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण स्वामी विवेकानंद असे केले.

रामकृष्ण मठाची स्थापना श्री रामकृष्णांच्या महासमाधीनंतर स्वामी विवेकानंदांनी आपले एक गुरुबंधू तारकनाथ यांच्या मदतीने कोलकात्याजवळील वराहनगर या भागात एक पडक्या इमारतीत मठाची स्थापना केली. तत्पूर्वी त्या जागेत भुतांचा वावर आहे, असा लोकप्रवाद होता. विवेकानंदांनी रामकृष्णांनी वापरलेल्या वस्तू आणि त्यांच्या भस्मास्थींचा कलश त्या ठिकाणी नेऊन ठेवला आणि त्यांचे भक्त तेथे राहू लागले. स्वामी विवेकानंद हे त्यांच्या समकालीन भारतातील सर्वात प्रभावशाली तत्त्वज्ञ आणि समाजसुधारकांपैकी एक होते आणि पाश्चात्य जगामध्ये वेदांताचे सर्वात यशस्वी मिशनरी होते. समकालीन हिंदू सुधारणा चळवळींमध्येही ते एक प्रमुख शक्ती होते आणि त्यांनी वसाहतवादी भारतातील राष्ट्रवादाच्या संकल्पनेत योगदान दिले. आधुनिक भारतातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती आणि देशभक्त संत म्हणून त्यांना आता व्यापकपणे ओळखले जाते. त्यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो.

गुरू रामकृष्णजींच्या समाधीनंतर स्वामी विवेकानंद भारत भ्रमण करण्यास बाहेर पडले. अखेरीस ते कन्याकुमारी या भारताच्या दक्षिण टोकाला जाऊन पोहोचले. तेव्हा त्यांनी समुद्रात उडी मारली आणि शिलाखंडावर जाऊन ध्यानात बसले. त्यावेळी भारतातील दैन्य पाहून त्यांचे कासावीस झालेले मन अधिकच हळवे झाले. भारताच्या कल्याणासाठी, येथील जनतेच्या उद्धारासाठी आयुष्य समर्पित करणे आणि त्यासाठी या मातृभूमीचा सेवक बनून झटणे, असा दृढ संकल्प स्वामीजींनी केला. अद्वैत वेदान्त विचार जगभरात पोचविणे आणि माणसातील सुप्त मनुष्यत्व जागे करणे, यासाठी त्यांनी भारताच्या सीमा ओलांडून पाश्चिमात्य जगात जाण्याचेही ठरविले. पुढे शुक्रवार दि.४ जुलै १९०२ या दिवशी त्यांनी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. समाधी घेण्याच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना शुक्ल यजुर्वेदाचा पाठ शिकवला आणि स्वामी प्रेमानंद या गुरुबंधूंसमवेत काही काळ फिरत असताना त्यांना रामकृष्ण मठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असतांना रात्री नऊ वाजून दहा मिनिटांनी त्यांनी समाधी घेतली आणि चाळीस वर्षापर्यंत जगणार नाही, ही स्वतःची भविष्यवाणी खरी केली. कन्याकुमारी येथे समुद्रात काही अंतरावर त्यांचे विवेकानंद स्मारक विवेकानंद केंद्र या संस्थेच्या पुढाकाराने उभे राहिले आहे आहे.

!! संतशिरोमणी स्वामी विवेकानंदजींना त्यांच्या पावन समाधीदिनी करोडो विनम्र अभिवादन !!


**********

– संकलन व सुलेखन –
संतचरणधूळ: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# या प्रकरणांच्या नंतर होत असलेल्या कवित्वातही बरेच साम्य आहे

ऐन निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्रात दोन मोठे अपघात झाले. मुंबईत घाटकोपरला मोठा जाहिरात फलक कोसळला. त्याखाली माणसे किड्या मुंगीसारखी चिरडली गेली. पुण्यात एका बड्या बापाच्या मुलाने दारू पिऊन बेफाम गाडी चालवली दोन निष्पाप जीव गेले. याहीनंतर, गेल्या आठवड्यात बाणगंगेतला गाळ काढण्यासाठी कंत्राटदाराने निर्बुद्धपणे पायऱ्यांवर अवजड यंत्र घातले आणि पायऱ्या तोडून टाकल्या. या सगळ्या प्रकरणांत नियमच नसणे, नियम आहेत तिथे नियामकाचे दुर्लक्ष, कुंपणानेच शेत खाणे असे बरेच समान पैलू आहेत.

घाटकोपरला अति प्रचंड फलक दोन वर्ष तरी जाग्यावर होता. तो नीट लावलाय का हे बघायची जबाबदारी कोणाचीच नव्हती. फलकाच्या आकारावर नियमाने बंधने आहेत. ती बंधने पाळली गेलेली नाहीत हे शेंबड्या पोरालाही कळले असते पण ज्यांची जबाबदारी होती त्यांच्या डोळ्यावर गांधारीची पट्टी होती. ज्यांनी या फलकाला परवानगी दिली त्यांच्यावर तर कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी होती. पुण्यात अल्पवयीन मुलगा दारू ढोसत होता. अल्पवयीन मुलांना दारू वाढू नये असा नियम आहे. तो नियम पाळायचा तर जे ही दारू वाढायचे काम करतात, त्यांनी काय करावे? ग्राहकाचे आधार कार्ड किंवा तत्सम ओळखपत्र मागावे काय? या बाबतीत काहीच नियम नाहीत. ज्या अबकारी खात्याने, पोलीस खात्याने हा नियम पाळला जात आहे याची खात्री करायची त्यांना या कामासाठी सवड नाही. किंबहुना सर्रास सगळ्या मद्यालयांमध्ये दिसणारी तरुण मुले मुली यांना दिसत नसावीत. रस्त्याने बेफाम वेगाने जाणारे वाहन जागोजागी लावलेल्या कॅमेऱ्यात टिपले जावे अशी सोय आहे. पण त्यावर सतत लक्ष ठेवणारी आणि त्याप्रमाणे इशारा देणारी यंत्रणा नाही. रात्री गस्तीवर पोलीस नाहीत, असले तरी त्यांना हे वाहन दिसले नाही. दिसले तरी ते थांबवण्याची बुद्धी झाली नाही. बुद्धी किंवा इच्छा असली तरी ते कसे करायचे याची सोयच नाही. बाणगंगेला कंत्राटदारावर गुन्हा वगैरे दाखल झाला आहे. पण त्याच्यावर लक्ष ठेवायची जबाबदारी कोणाची होती. त्यांनी पुरेसे लक्ष ठेवले का? महापालिका आयुक्त, मुख्यमंत्री, बरेचसे मंत्री, वरिष्ठ अधिकारी घटनास्थळाच्या हाकेच्या अंतरावर रहातात. या सगळ्यांचा कोणताच धाक




कंत्राटदारावर आणि त्याच्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती त्यांना राहिला नाही का? महापालिकेच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून साधा खुलासाही मागवला गेलेला नाही.आपल्या प्रचंड प्रगती वगैरे करणाऱ्या देशाची अवस्था अशी भयानक आहे. या प्रकरणांच्या नंतर होत असलेल्या कवित्वातही बरेच साम्य आहे आणि ते आणखीच भयानक आहे. या घटना घडल्यावर प्रथम काय झाले तर सगळ्या यंत्रणा हात झटकू लागल्या. हे आमचे कामच नाहीपासून हा दोष कसा दुसऱ्या कोणाचा आहे हे सांगण्याची चडाओढ सुरू झाली. व्यवस्थेतल्या कोणाचा काटा काढायचा असेल त्याच्यावर हे सगळे कसे शेकेल यासाठी पद्धतशीरपणे सापळे लावले गेले. त्या संबंधित बातम्या नीट पेरल्या गेल्या. माध्यमे वेड पांघरून पेडगावला गेल्यासारखी निर्बुद्धपणे त्यांना जी माहिती पुरवली गेली ती प्रसिद्ध करू लागली. गुन्ह्याशी संबंधित नसलेली पण गुन्हेगारांबद्दलची चटपटीत माहिती प्रसिद्ध करण्याची चढाओढ लागली आहे.

मुळात सगळ्यांना लवकरात लवकर गुन्हेगार कोण हे ठरवायची घाई झाली आहे. जणूकाही गुन्हेगार ठरवून एखाद्याला बेड्या ठोकल्या की अशा घटना परत घडणारच नाहीत अशी सगळ्यांची कल्पना करून दिली गेली आहे. गुन्ह्यामागची पार्श्वभूमी शोधणे, गुन्हेगाराला पकडणे हे गरजेचे आहेच. जास्त महत्त्वाचे आहे ते म्हणजे तपासकार्यात ढिसाळपणा न ठेवला जाणे, जे कोणी गुन्हेगार पकडले जातील त्यांच्यावर लवकरात लवकर खटला दाखल होणे आणि खटल्यात त्यांचा दोष सिद्ध होण्याची हमी कोणीतरी घेणे. हे होणार नसेल तर आता होणारा सगळा तमाशा आहे हे आपण समजून घेणे गरजेचे आहे.

दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे या घटनांमागचा कार्यकारण भाव शोधून काढणे. हे का घडले? कसे घडले? हे परत घडू नये म्हणून काय करायचे? हे प्रश्न उपस्थित होणे. त्यांची उत्तरे जनतेला मिळणे. उत्तरांवरून बोध घेतला आहे याची ग्वाही दिली जाणे आणि त्या बोधानुरुप कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणीतरी घेणे. दुर्दैवाने हा पैलू जनता, विधीमंडळ, कार्यकारी यंत्रणा वा प्रसारमाध्यमे कोणाच्याही विषयपत्रिकेवर नाही.

# झटपट वजन कमी करण्यासाठी उच्च तीव्रतेचा व्यायाम केल्यामुळेही वाढू शकतं वजन? तज्ज्ञ काय सांगतात



वजन वाढणे ही आजकाल सर्वांत मोठी आरोग्य समस्या आहे. वाढलेले वजन अनेकांची डोकेदुखी झाली आहे. त्यामुळे तुम्हाला विविध आजार जडतात, लठ्ठपणा वाढल्यास उच्च रक्तदाब, कंबरदुखी, हृदयाचे आजार, गुडघेदुखी यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा तासन् तास जिममध्ये घाम गाळतात; परंतु तरीही वजन कमी होत नाही. खरं तर वजन कमी करताना नकळत आपल्याकडून होणाऱ्या चुकांमुळेसुद्धा वजन वाढतं. आता वाढत्या वजनानं त्रस्त झालेले लोक जिममध्ये जाऊ लागले आहेत. अशा वेळी जर कोणी झटपट वजन कमी करण्यासाठी गरजेपेक्षा जास्त व्यायाम करीत असेल, तर ते आरोग्यासाठी फायदेशीर आहे का? वजन कमी करण्यासाठी व्यायाम करणं हे चांगलं आहे हे आपल्या सर्वांनाच माहीत आहे. पण, गरजेपेक्षा जास्त व्यायाम केल्यानं तुमचं वजन वाढू शकतं का? उच्च तीव्रतेच्या व्यायामामुळे वजन वाढू शकतं का? याच विषयावर हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. जगदीश जे. हिरेमठ यांनी याबाबत माहिती दिल्याचं वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे. आपण त्याबाबत सविस्तर जाणून घेऊ. फिटनेस मिळविण्यासाठी आरोग्यदायी आहारासोबत रोजचा व्यायामही महत्त्वाचा असतो; पण विचार न करता, व्यायाम केल्यास तोही आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. व्यायामशाळेमध्ये वजन उचलून वजन कमी करण्याचा किंवा तंदुरुस्त राहण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना अनेकदा शंका असते की, जड वजन उचलून व्यायाम करणं योग्य आहे की नाही? जपानमधील सुकुबा विद्यापीठातील इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ ॲण्ड स्पोर्ट्स सायन्सेसचे प्रमुख संशोधक ताकाशी मात्सुई, पीएचडी यांनी मेडिसिन ॲण्ड सायन्स इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाइजमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष मेडिकल न्यूज टुडेकडे स्पष्ट केले आहेत. त्यानुसार, आमच्या अभ्यासात असं आढळून आलं आहे की, वजन कमी करण्यासाठी व्यायाम ही एक शक्तिशाली रणनीती आहे; परंतु उच्च तीव्रतेच्या व्यायामामुळे जास्त घाम येतो. त्यानंतरच्या शारीरिक हालचाली आणि मुख्य शरीराचं तापमान लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतं; ज्यामुळे वजन वाढतं. विशेष म्हणजे वजन वाढण्याची ही स्थिती अन्नाच्या सेवनात कोणताही बदल न झाल्यासही उद्भवते.

तर दुसरीकडे हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. जगदीश जे. हिरेमठ म्हणतात की, उच्च तीव्रतेचा व्यायाम काही विशिष्ट परिस्थितीत शरीराचं वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकतो. जसं तुम्ही पुरेशी झोप न घेता, उच्च तीव्रतेचा व्यायाम करीत असाल, तर त्यामुळे तुमच्या आरोग्याबरोबरच तुमच्या वजनावरसुद्धा दुष्परिणाम होऊ शकतो. उच्च तीव्रतेचा व्यायाम फक्त वजनच वाढवत नाही, तर अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्या उद्भवण्यासाठीही कारण ठरतं. खरं तर संयम ठेवून व्यायाम केल्यानं आपल्या शरीराला आराम मिळतो.

# जांभूळ आरोग्यासाठी चमत्कारापेक्षा कमी नाही, जाणून घ्या त्याचे १० फायदे

उन्हाळा असो किंवा हिवाळा, प्रत्येक हंगामात जांभळाची चव अप्रतिम लागते. हे छोटे फळ स्वादिष्ट तर आहेच पण आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर आहे.

जांभूळ खाण्याचे १० फायदे:

१. रक्तदाब नियंत्रण: जांभळामध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या लोकांसाठी हे फळ खूप फायदेशीर आहे.

२. रक्तातील साखरेचे नियंत्रण:जांभळामध्ये फायबर आणि अँटिऑक्सिडेंट असतात जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. हे टाइप २ मधुमेहाचा धोका कमी करण्यास मदत करते.

३. पचन सुधारते: जांभळामध्ये असलेले फायबर पचन सुधारण्यास मदत करते. हे बद्धकोष्ठता आणि अपचन सारख्या समस्या टाळते.



४. वजन कमी करण्यास मदत करते: जांभळामध्ये कॅलरी कमी आणि फायबर जास्त असते. यामुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

५. हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर: जांभळामध्ये अँटिऑक्सिडेंट असतात जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होण्यास मदत होते.

६. त्वचेसाठी फायदेशीर: जांभळामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात ज्यामुळे त्वचा निरोगी आणि चमकते. हे सूर्याच्या हानिकारक किरणांपासून त्वचेचे संरक्षण करते आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करते.

७. डोळ्यांसाठी फायदेशीर: जांभळामध्ये व्हिटॅमिन ए असते जे डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहे. हे दृष्टी सुधारण्यास आणि मोतीबिंदूचा धोका कमी करण्यास मदत करते.

८. इम्युनिटी बूस्टर: जांभळामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडेंट असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. हे तुम्हाला आजारांपासून वाचवण्यास मदत करते.

९. तणाव कमी करण्यास मदत करते: जांभळामध्ये मॅग्नेशियम असते जे तणाव कमी करण्यास मदत करते. हे तुम्हाला शांत आणि आरामदायक वाटते.

१०. इतर फायदे: जांभळामध्ये कॅल्शियम, लोह आणि फॉस्फरस सारखी खनिजे देखील असतात जी शरीरासाठी आवश्यक असतात.

जांभूळ कसे खावे:

तुम्ही जांभळाचा ताजा रस, रस, स्मूदी किंवा डेझर्टमध्ये खाऊ शकता.

लक्षात ठेवा: जांभूळ धुतल्यानंतरच खा. तुम्हाला काही आरोग्य समस्या असल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

जांभूळ हे एक स्वादिष्ट आणि आरोग्यदायी फळ आहे. हे तुमचे शरीर आतून मजबूत बनवते आणि तुम्हाला निरोगी राहण्यास मदत करते.

# बदाम डिंकाचे फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

तुम्ही डिंक नावाचा पदार्थ ऐकलाय ना? पण तो हिवाळ्यात खायचा पदार्थ आहे. शरीराचे तापमान थंड ठेवण्यासाटी बदाम डिंक वापरतात. हा डिंक पाण्यात विरघळून किंवा गरम करून नव्हे तर पाण्यात भिजवून खाल्ला जातो. उन्हाळ्यात शीतपेये पिण्याकडे अनेकांचा कला असतो मध्य पूर्व भागात गोंड कतिरा म्हणून ओळखला जाणारा स्फटिकमय पदार्थ उन्हाळ्यात अत्यंत गुणकारी मानला जातो. त्रागासांथ गम म्हणून ओळखला जाणारा हा औषधी डिंक गोड बदामाच्या सालापासून मिळवला जातो. तुर्कस्तान, इराण या भागात प्रामुख्याने बदाम डिंक सापडतो. प्रकृतीने थंड असणारा हा पदार्थ पाण्याला उत्तम पोत देऊ शकतो त्यामुळे विविध पेयांमध्ये याचा वापर केला जातो. बदाम डिंकाचे औषधी उपयोग खालीलप्रमाणे आहेत – पाण्याची घनता वाढवणे – पदार्थाची घनता वाढवणे – पदार्थाचा पोत सुधारणे – पदार्थाचे स्थैर्य वाढवणे आहारशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास तंतुमय पदार्थानी भरपूर तसेच विविध खनिजांनी युक्त असा बदाम डिंक पोटॅशिअम, कॅल्शिअम, लोह, मॅग्नेशिअम यांनी भरपूर आहे. त्यामुळे विविध आजारांवर उपायकारक आहे. – उष्माघाताचा प्रभाव कमी करणे – मलावरोध दूर करणे – आतड्याचे



आरोग्य सुधारणे – चेहऱ्यावरील सुरकुत्यांचे प्रमाण कमी करणे – दुग्धजन्य पदार्थांची घनता वाढविणे – शरीरातील उष्णता कमी करणे – दमा, अस्थमामुळे होणारे श्वसनाचे त्रास कमी करणे – ट्रायग्लिसेराईड्सचे वाढीव प्रमाण कमी करणे – कर्बोदकांचे भरपूर प्रमाण असणारा हा पदार्थ अगदी २–३ ग्राम इतका जरी दिवसभरात वापरला तरी – शरीरातील उष्णता कमी करणे – शरीराचे तापमान कमी करणे – वजन नियंत्रणात ठेवणे – शरीरातील अतिरिक्त चरबीचे प्रमाण कमी करणे काही संशोधनानुसार बदाम डिंकामध्ये असणाऱ्या अँटिऑक्सिडंट्स आणि फिनॉलिक द्रव्यांमुळे चयापचय क्रिया पूर्ववत होण्यास मदत होते. बदाम डिंकाचे सेवन कसे करावे? – २ –३ ग्राम डिंक २००–३०० मिली पाण्यात भिजवून ठेवावा. त्या पाण्याचा वापर दुधासोबत किंवा इतर द्रव पदार्थासोबत करावा. – उन्हाळ्यात सरबताबरोबर देखील बदाम डिंक प्यायला जाऊ शकतो. – फळांच्या रसापासून घरगुती आईस्क्रीम तयार करण्यासाठी बदाम डिंक उपयुक्त आहे. – जेवणानंतर ताक किंवा जिरेपाणी पिताना त्यातदेखील बदाम डिंक टाकून हे द्रव पदार्थ प्यायले जाऊ शकतात . – व्यायाम करणाऱ्यांमध्ये व्यायामाआधी २ तास बदाम डिंकाचे पाणी प्यायले जाऊ शकते. – भाज्यांच्या रसांना जेलीसदृश घनता यावी म्हणून बदाम डिंक वापरला जाऊ शकतो. या उन्हाळ्यात थंडगार बदाम डिंक नक्की प्या आणि स्वास्थ्य सांभाळा.

# पावसाळ्यात कोणते पदार्थ खावेत आणि कोणते टाळावेत? डॉक्टरांकडून घ्या जाणून.



आता पावसाळा सुरू झाला आहे. पाऊस सुरू झाला की, अनेकांना गरम गरम भजी, वडापाव असे मसालेदार आणि चटपटीत पदार्थ खाण्याची इच्छा होते. पण, सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कारण– हे वातावरण जलजन्य आणि वायुजन्य रोगांसाठी अनुकूल असल्याने या काळात आपली चयापचय क्षमता मंदावते, तेव्हा आपल्या शरीरातील चैतन्य आणि उर्जा पातळी कमी होते; जी रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करते. त्यामुळे आपल्याला आजार आणि संसर्ग होण्याची अधिक शक्यता असते. त्याशिवाय या काळात ऊर्जेची मागणी वाढते आणि त्यामुळे काही ना काही खाण्याची लालसा निर्माण होते. आहारतज्ज्ञ अनिता जटाना यांनी पावसाळ्यात आजारांपासून दूर राहण्यासाठी काय करावे आणि काय नाही? याबाबत दी इंडियन एक्स्प्रेसला सविस्तर माहिती दिली आहे. कोणते पदार्थ खावेत? तुमचा आहार क जीवनसत्त्व, अँटिऑक्सिडंट्स आणि विरघळणारे फायबर्स या घटकांनी समृद्ध असावा. तांदूळ असो, डाळ असो, चपाती असो वा भाजी, प्रत्येक गोष्ट ताजी असावी. शक्यतो अन्न शिजविल्यानंतर पहिल्या तासातच खावे. १) संपूर्ण भाज्या : रोगप्रतिकारक शक्ती आणि एकूण आरोग्य सुधारण्यासाठी फायदेशीर असलेल्या भाज्या निवडा. शक्य असेल तिथे संपूर्ण भाज्या निवडा आणि बाहेरील त्वचा सोलून घ्या. या भाज्यांमध्ये दुधी भोपळा, कारले, गवार, भोपळा, गाजर, मटार, ब्रोकोली व कडधान्ये. इतर भाज्यांच्या पर्यायांमध्ये काकडी, टोमॅटो, बीन्स (फरसबी), भेंडी व मुळा यांचा समावेश होतो. या भाज्यांमध्ये नैसर्गिकरीत्या क्षारीय घटक असतात; जे प्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत करतात. २) सूप : कोमट आणि पौष्टिक सूप; जसे– चिकन, भाज्या व डाळी यांचे सूप पावसाळ्यासाठी योग्य असते. ते पचण्यास सोपे आहेत आणि आपल्याला शरीरात पाण्याची पातळी राखण्यास मदत करू शकते. त्यामुळे सांबर आणि रसम खा; जे केवळ उबदारपणाच देत नाही, तर तुमची रोगप्रतिकार शक्तीदेखील वाढवते. त्यामुळे तुम्हाला संसर्गाशी लढण्यास मदत मिळते. ३) हर्बल टी : तुमचे शरीर उबदार आणि हायड्रेट ठेवण्यासाठी आले, तुळशी (पवित्र तुळस) व पुदीना यांसारख्या हर्बल टीचे सेवन करा. या चहामध्ये औषधी गुणधर्मदेखील आहेत; जे पावसाळ्यातील सामान्य आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. ४) फळे : अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वांनी समृद्ध हंगामी फळे खा; परंतु ती धुतलेली आणि ताजी कापलेली आहेत याची खात्री करा. संसर्ग होऊ नये म्हणून रस्त्यावरील विक्रेत्यांकडून कापलेली फळे आणि रस घेणे टाळा. कापलेली फळे फ्रिजमध्ये ठेवू नका. कारण– काही जीवाणू थंड तापमानात वाढू शकतात. सर्दी आणि तापापासून बचाव करण्यास डाळिंब मदत करते.

हे अँटिऑक्सिडंट्सनी समृद्ध आहे. तसेच त्यात दाहकविरोधी प्रभाव आहे आणि रक्तदाबदेखील ते नियंत्रित करते. तसेच उच्च जीवनसत्त्व, लोह, मॅग्नेशियम, फायबर, कॅल्शियम आणि इतर पोषक घटकांमुळे मनुका हे सर्वोत्तम पावसाळी फळांपैकी एक म्हणून ओळखले जाते. ते अतिसार नियंत्रित करू शकते. मनुका, मध व खजूर यांचे सेवन करा; जेणेकरून तुम्हाला सुक्या मेव्यामधून ऊर्जा आणि फ्रक्टोज मिळेल. मग तुम्हाला तृप्तीची भावनादेखील मिळेल.

५) प्रथिने : तुमच्या जेवणात डाळी, पाश्चराइज्ड– उकळलेले दूध आणि चांगले उकडलेली अंडी यांसारख्या स्रोतांमधून पुरेशा प्रमाणात प्रथिने मिळतील याची खात्री करा. हे घटक चांगले आरोग्य राखण्यासाठी आणि रोगप्रतिकार शक्ती मजबूत करण्यासाठी आवश्यक आहेत. ६) मसाले : हळद, दालचिनी, लवंगा व काळी मिरीमध्ये दाहकविरोधी आणि प्रतिजैविक गुणधर्म असतात; जे आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. ७) प्रो–बायोटिक्स : दही आणि ताक यांसारखे पदार्थ आतड्यांचे आरोग्य निरोगी राखण्यासाठी उत्तम आहेत; जे चांगली रोगप्रतिकार शक्ती निर्माण करतात आणि पचनास मदत करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

पावसाळ्यात कोणते पदार्थ टाळावेत? १) स्ट्रीट फूड : रस्त्यावरील खाद्यपदार्थ, विशेषतः पाणीपुरी, भेळपुरी आणि इतर चाट पदार्थ खाणे टाळा. हे पदार्थ अस्वच्छ परिस्थिती आणि दूषित पाण्याच्या संभाव्य संपर्क यांमुळे धोकादायक ठरू शकतात. जर तुम्हाला खाण्याची इच्छा झाली, तर ताजे शिजविलेले अन्न निवडा आणि सर्व कच्चे पदार्थ टाळा. २) कमी शिजविलेले मांस, मासे व अंडी : कमी शिजविलेले मांस, सी–फूड (मासे) व अंडी खाणे टाळा. कारण– त्यात हानिकारक जीवाणू असू शकतात. ३) चांगले न वाफविलेले सॅलड : सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भरपूर पाणी प्या. प्रवास करताना पाण्याची बाटली बरोबर ठेवा किंवा बाटलीबंद पाण्याचा पर्याय निवडा. आपण आपल्या आहारात घरगुती लिंबाचा रस, ताक व नारळ पाणीदेखील समाविष्ट करू शकता.

# प्रवास करताना हे ३ प्रकारचे आरोग्यदायी पदार्थ घेऊन जा, लवकर खराब होणार नाही

प्रवास रोमांचक असला तरी खाण्यापिण्याची चिंताही मनावर कायम आहे. विशेषत: लांबच्या प्रवासात खराब होणाऱ्या अन्नाबाबत नेहमीच भीती असते. पण काळजी करू नका, असे काही पदार्थ आहेत जे जास्त काळ खराब होत नाहीत आणि प्रवास करताना तुमच्यासाठी योग्य पर्याय आहेत.

१. लाडू: चव आणि पौष्टिकतेचा संगम लाडू हे स्वादिष्ट तसेच पौष्टिकतेने परिपूर्ण असे अन्न आहे. तूप, गूळ, ड्रायफ्रुट्स आणि ड्रायफ्रुट्सपासून बनवलेले लाडू जास्त काळ खराब होत नाहीत आणि प्रवासादरम्यान ते तुमच्या उर्जेचा स्रोत बनतात. फायदे: लाडूमध्ये असलेले गूळ आणि सुका मेवा तुम्हाला आवश्यक ऊर्जा देतात आणि तुमच्या शरीराला आवश्यक पोषक तत्त्वेही देतात.

कसे साठवायचे: लाडू हवाबंद डब्यात ठेवा आणि प्रवासादरम्यान सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.

२. नट: पोषणाचे भांडार अक्रोड, बदाम, काजू, पिस्ता, शेंगदाणे यांसारखे नट प्रवासासाठी उत्तम पर्याय आहेत. हे भरपूर पोषक असतात आणि जास्त काळ खराब होत नाहीत. फायदे: नटांमध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. हे तुम्हाला ऊर्जा देतात आणि तुमचे शरीर निरोगी




ठेवण्यास मदत करतात. कसे साठवायचे: काजू हवाबंद डब्यात ठेवा आणि प्रवासादरम्यान सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.

३. सुका नाश्ता: सुका चिवडा किंवा नमकीन सुका चिवडा किंवा नमकीन हा एक असा नाश्ता आहे जो प्रवासादरम्यान सहज उपलब्ध होतो आणि बराच काळ खराब होत नाही. यामुळे तुम्हाला हलका नाश्ता करण्याचा पर्याय मिळतो.

फायदे: सुका चिवडा किंवा नमकीन तुम्हाला भुकेपासून वाचवण्यास मदत करतो आणि प्रवासादरम्यान तुमचा उर्जेचा स्रोत बनतो.

कसे साठवायचे: चिवडा किंवा नमकीन हवाबंद डब्यात ठेवा आणि प्रवासादरम्यान सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.

प्रवासासाठी काही अतिरिक्त टिपा: प्रवास करण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि आवश्यक औषधे तुमच्यासोबत ठेवा.

प्रवासादरम्यान पाणी पिण्यास विसरू नका.

हलके आणि सहज पचणारे अन्न खा.

खाद्यपदार्थ स्वच्छ ठेवा.

हे पदार्थ आणि टिप्स लक्षात ठेवून तुम्ही तुमची सहल आणखी अविस्मरणीय बनवू शकता.

# आदम नगर,याहिया कॉलोनी,बुर्हाण नगर,अब्दुल कलाम नगर महाराणा प्रताप नगर,बादाडे नगर नाली रस्ते न झाल्यास तीव्र आंदोलन करणार

लातूर : लातूर शहरातील बहुतांश स्लम भागातील वस्त्या या नागरी सुविधांपासून वंचित आहे ज्यांमध्ये प्रामुख्याने आदम नगर,याहिया कॉलोनी,बुर्हाण नगर,अब्दुल कलाम नगर महाराणा प्रताप नगर,बादाडे नगर आहेत या भागात गेल्या पंधरा ते विस वर्षांपासून कोणत्याच प्रकारची विकास कामे झाली नाहीत या भागातील नागरिकांचा वापर फक्त राजकीय पुढाऱ्यांनी मतदानासाठी घेतला तर महापालिका अधिकारी यांनी विविध टॅक्सच्या मध्यमातून फक्त वसुली केली परंतु विकास मात्र आश्वासनाच्या कागदावरच राहिला, स्थानिक नागरिक जगू अथवा मारू त्याच्याशी यांचं काही देनं घेणं नाही.आदम नगर,याहिया कॉलोनी,बुर्हाण नगर,अब्दुल कलाम नगर महाराणा प्रताप नगर,बादाडे नगर या भागात रस्ते,नाल्या,लाईट पाणी,कचरा निवारणाचा अभाव आहे गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक जगण्यासाठी तारेवरची कसरत करीत असतात,वृद्ध,शाळेतील विध्यार्थी,याची गाई सोया होत असते,पावसाळ्यात या भागातील दुरावस्था बिकट असते म्हणून स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने संयुक्त निवेदन दिनांक २०-०६-२४ रोजी भागात रस्ते,नाल्या,लाईट पाणी,कचरा निवारणासाठी महापालिकेस देण्यात आले होते आणि आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला होता परंतु माननीय उपायुक्त खानचोले यांच्या आश्वासनाने हे आंदोलन स्थगित केले गेले होते परंतु महापालिका प्रशासन याबाबत काय भूमिका घेते कि नाही याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे,संबंधित समस्यांबाबत महापालिका गंभीर 'न' घेतल्यास तीव्र आंदोलनाची भूमिका मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने घेण्यात येणार असल्याचे







संघटनेचे अध्यक्ष मोहसीन खान यांनी व्यक्त केली आहे. गरज नसलेल्या भागात टेंडर काढून महापालिकेने रस्त्यावर रस्ते बांधले,ज्या वस्त्यांना सुविधा मिळत नाही तेथे काम झाले नाहीत,रस्त्यांअभावी नागरिकांना विशेषतः लहान मुलांना शाळेत जाण्यास त्रास होतो त्याना माखलेल्या चिखलातून ये-जा करावं लागतं.म्हणून महापिलेने संबंधीत आदम नगर,याहिया कॉलोनी,बुर्हाण नगर,अब्दुल कलाम नगर महाराणा प्रताप नगर,बादाडे नगर काम करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. 'निवडणुका नसल्याने लोकप्रतिनिधी नाहीत,आयुक्त 'मालक' कोणाला भेटत नाहीत फक्त टेंडर काढण्यासाठीच ते मनपात येतात, जनतेच्या प्रश्नांवर ते गंभीर नाहीत शहरातील मुख्य मुलायम रस्ते सोडले तर संपूर्ण शहर खड्डेमय झाले आहे ते माननीय आयुक्तांना दिसत नाही,आदम नगर,याहिया कॉलोनी,बुर्हाण नगर,अब्दुल कलाम नगर महाराणा प्रताप नगर,बादाडे नगर या बाबतीत महापालिका डोळेझाक करीत असेल तर तीव्र आंदोलन संघटनेच्या वतीने करणार' मोहसीन खान,अध्यक्ष स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषद,लातूर

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रकशित करावी हि नम्र विनंती.
आपला मोहसीन खान, अध्यक्ष: स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषद,लातूर

# रेशन दुकानदारांच्या अडचणी सोडवन्यासाठी पाठपुरावा करणार : संतोष सोमवंशी

लातूर/ प्रतिनिधी :- अखिल महाराष्ट्र स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या व लातूर जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.या अंदोलनास महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला आणि रेशन दुकानदाराच्या अडचणी सोडवण्यासाठी पाठपुरावा करू, असे आश्वासन यावेळी दिले. जिल्हाध्यक्ष सुधाकर दाजी पाटील व आर. आर. जोगदंड, औरंगाबाद विभाग सचिव इंद्रजीत यादगिरे, जिल्हा मीडिया प्रमुख तथा संघटक लातूर जिल्ह्यामधील सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी रेखा कदम, आशा टोणगे, चतुराताई जाधव, मंगेश चव्हाण हाजी चाऊस, राहुल माने, महादेव कांबळे सचिन कांबळे व जिल्ह्यातील साडेचारशे दुकानदार या आंदोलनात सहभागी झाले होते.




दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ करणे किंवा वेतनश्रेणी लागू करणे शासनाच्या नियमाप्रमाणे धान्य वजन करून हमाली बंद करणे अशा अनेक प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी हे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.
मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या या धरणे आंदोलनास महाराष्ट्र राज्य बाजार समिती महासंघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांनी भेट देत मार्गदर्शन केले व पाठिंबा दिला. जिल्हा अध्यक्ष सुधाकर दाजी पाटील व दहा तालुक्यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव व जिल्ह्यातील सर्व रास्त भाव दुकानदार यावेळी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई

मुंबई : - 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्सनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# दिक्षाभूमी वर झालेला जनक्षोभ म्हणजे सरकारचे अपयश - डॉ. नितीन राऊत

नागपूर / प्रतिनिधी :- दीक्षाभूमीवर भूमिगत पार्किंगविरोधात जनक्षोभ उसळला व काल त्याचे पडसाद उमटले. म.वि.स. नियम ५७ नुसार विधानसभेत नव्या विकास आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामाबद्दल सविस्तर चर्चा करण्याची मागणी राज्याचे माजी मंत्री आणि आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली असतांना शासनाने ही मागणी फेटाळली आहे. यावरून असे निदर्शनास आले की राज्य सरकारकडून या विषयावर चर्चेकरिता कोणताच प्रयत्न होताना दिसत नाही. काल झालेला जनक्षोभ म्हणजे या ट्रिपल इंजिन सरकारचे अपयश आहे. अश्या शब्दात डॉ. राऊत यांनी राज्य सरकार वर टिका केली.

दीक्षाभूमीच्या विकासासाठी सक्रिय पावले उचलण्यात सरकार कमी पडत आहे. यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी करुन घेतला आहे. सरकारचा हा खोटारडेपणा यापुढे चालणार नाही. मी या प्रश्नावर प्रखरपणे विधानसभेत आवाज उठवणार म्हणजे उठवणार अश्या शब्दात डॉ. राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत टीका केली आहे.

१) 'हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मूलभूत मानवी हक्कांसाठी आहे, अशी गर्जना संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इतिहासात अजरामर झालेल्या चवदार तळ्याच्या पायथ्याशी केली होती. परंतु आजची अवस्था धक्कादायक आहे. चवदार तळ्याचे पाणी आम्ही आजही पिऊ शकत नाही. त्यामुळे अमृतसर येथील स्वर्ण मंदिराच्या धर्तीवर या ठिकाणी पाण्याच्या निर्जंतुकीकरणासाठी ओझोनचा वापर करून येथील पानी पिण्यायोग्य करणार काय?



२) पाणी हा प्रत्येक सजीवाचा अधिकार आहे आणि तो प्रत्येक सजीवाने मान्य करायलाच हवा, अशी समतेची भूमिका घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळे सत्याग्रह केले होते. यावर्षी या सत्याग्रहाला १०० वर्ष पूर्ण होणार आहे. यानिमित्ताने महाडला हजारो आंबेडकरी अनुयायी दाखल होतील, अनेक कार्यक्रमाचं आयोजन महाडसह संपूर्ण महाराष्ट्रात होणार आहे तसेच चवदार तळ्याचं पाणी प्राशन करुन भीमसैनिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करतील. त्यामुळे महाराष्ट्र शासन येथील पाण्याच्या निर्जंतुकीकरण करुन चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष साजरे करणार काय?

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई यांचं जिथं लग्न झालं त्या भायखळा मार्केट मध्ये मोठया जल्लोषात दरवर्षी यांच्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला जातो. महामानव यांच्या उपस्थितीत पावन झालेल्या भायखळा बाजारात त्यांचे प्रतीक म्हणून स्मारक उभारणार आहे काय?

महाराष्ट्र शासनाच्या नेतृत्वात जर प्रबळ इच्छाशक्ती असेल तर येथील विकास वेगाने होऊ शकतो. जी तत्परता सरकारने दिक्षाभूमी वर भूमिगत वाहनतळ करायला दाखविली, त्याच प्रकारची प्रबळ इच्छाशक्ती येथे कां दाखविली जात नाही? असे तीन महत्वाचे प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केले.

# सौदर्यवती मी महाराष्ट्राची स्पर्धेत लातूरची राखी देशपांडे विजेती

लातूर :- रॉयल ग्रूप, पुणे मार्फत ३० जून रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या सौंदर्यवती मी महाराष्ट्राची आणि रॉयल मिस्सेस वर्ल्ड स्पर्धेत पुणे, मुबंई, सोलापूर इथल्या सर्व स्पर्धकाना मागे टाकून आपल्या लातूरच्या राखी शैलेश देशपांडे... यांनी बाजी मारली आहे.. या दोन्ही स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकवला आहे.. त्यामुळे शिक्षणाबरोबरच लातूर सौन्दर्यातही मागे नाही हे राखी यांनी सिद्ध केले आहे. .बिग बॉस फेम. दादूस, तृप्तीताई देसाई, सिनेअभिनेत्री मीरा जोशी, दिग्दर्शक शशिकांत डोईफोडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राखी देशपांडे यांच्या या सौन्दर्यवती पुरस्काराने लातूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या पुरस्कारबद्धल लातूरकराकडून राखी देशपांडे यांचे अभिनंदन केले जात आहे.




# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्कारासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर :- राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर किमान दहा वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांसाठी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. सन २०२३-२४ वर्षासाठी या पुरस्काराकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय पुरस्कारासाठी इच्छुक शिक्षक व शिक्षिका यांनी या लिंकवर आपली नोंदणी करून प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये एक माध्यमिक, एक प्राथमिक शिक्षक, एक गाईड शिक्षक, एक स्काऊट शिक्षक तसेच विभागातून एक आदर्श शिक्षिका पुरस्कार व राज्यस्तरावरून एक कला शिक्षक, एक क्रीडा शिक्षक व एक दिव्यांग शिक्षक अशा शिक्षकांची शिक्षक पुरस्कारासाठी निवडी केली जाणार आहे. तरी जास्तीत जास्त शिक्षकांनी या पुरस्कारासाठी नोंदणी करावी, असे आवाहन लातूर जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागेश मापारी यांनी केले आहे.

# प्रीपेड स्मार्ट मीटर योजना बंद - उपमुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : सर्वसामान्यांसाठी गैरसोयीची असलेली स्मार्ट मीटरसह 'आरडीएसएस'ची योजना महाविकास आघाडी सरकारच्या काळातच तयार झाली. मात्र, महायुतीचे सरकार अशा मीटरपासून ग्राहकांची सुटका करणार आहे. तसेच यापुढे मागेल त्याला सौर कृषिपंप दिला जाईल. प्रीपेड स्मार्ट मीटर योजना महाविकास आघाडी सरकारची असतानाही आता विरोधक यासंदर्भात फेक नरेटिव्ह पसरवत आहेत. आता ही योजनाच मी बंद करत आहे. त्यामुळे विरोधकांनी याबाबतचा अपप्रचार बंद करावा, असे आवाहनही त्यांनी केले. सध्या रोज ४०० ते ५०० सौर कृषिपंप बसवले जात असल्याची माहिती ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, राज्याने हाफ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा टप्पा पूर्ण केला असून, येत्या ३ ते ५ वर्षांत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वेगाने वाटचाल सुरू आहे. यासाठीचा मार्गदर्शक आराखडा तयार आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर देशाच्या अर्थव्यवस्थेप्रमाणेच आहे. शेती, जलसंधारण, आरोग्य बळकटीकरणासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. राज्यात महायुती सरकार आल्यानंतर १ लाख १८ हजार ४२२ कोटींची गुंतवणूक आणत महाराष्ट्र थेट परदेशी गुंतवणुकीमध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य झाले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या तुलनेत युती सरकारच्या काळात पावणेचार पट अधिक थेट परदेशी गुंतवणूक आली आहे. राज्यात महायुती सरकार नोकरभरती पारदर्शीपणे राबवत आहे. सव्वादोन वर्षांच्या काळात एक लाख लोकांना सरकारी नोकरी देण्याचा विक्रम आमच्या सरकारने केला आहे. नोकरभरतीसाठी ७० लाख उमेदवारांची परीक्षा घेण्यात आली. मात्र, या परीक्षांमध्ये पेपरफुटीचा एकही गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. परीक्षेतल्या गैरप्रकारांविरोधातला कायदा याच अधिवेशनात आणण्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. सध्या पोलिस दलातील पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच इतर पंचवीस विभागांमधील भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. विधानसभा निवडणुकीत आचारसंहिता आडवी येऊ नये, यासाठी पावसाळ्यात पोलिस भरती केली जात असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



एकही उद्योग बाहेर गेलेला नाही महाराष्ट्रातील कोणताही उद्योग राज्याबाहेर गेलेला नाही. तसेच सिंचन वाढवण्यासंदर्भात राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात काम सुरू केले असून, महाविकास आघाडी सरकारने रोखलेल्या १२१ सिंचन प्रकल्पांना फेरप्रशासकीय मान्यता दिली आहे. दीड लाख कोटी रुपयांच्या नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून तुटीच्या खोर्यांमध्ये पाणी पोहोचवण्याच्या प्रकल्पाची कामे पुढील वर्षी सुरू होतील. वाढवण बंदर महाराष्ट्राच्या विकासात मोठी भूमिका बजावणार आहे. हे बंदर तयार करताना तेथील मच्छीमार आणि स्थानिकांचे कोणतेही नुकसान होणार नाही, यासंदर्भात मच्छीमार आणि स्थानिकांशी चर्चा झाली आहे. धडाडी आणि वेगाने राज्य सरकार कार्यरत आहे. विरोधकांनी राजकारण न करता चुका दाखवून दिल्या तर सरकार त्या सुधारेल, असे फडणवीस यांनी उत्तराचा समारोप करताना सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE